# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 09/09/2023 (शनिवार) सायंकाळ

---

## चोरी

**पो.स्टे. नरखेड** :— अंतर्गत ०९ कि. मी. अंतरावरील मौजा मोवाड येथे दिनांक ०६/०९/२०२३ चे १३/३० वाजता ते दि. ०७/०९/२०२३ रोजी ००/१५ वाजता यातिल आरोपी क्र. १) सारीक युसुफ शेख, वय २८ वर्षे, रा. राहुल नगर अमरावती हा आपले ताब्यातील वाहन क्र. एम. एच. १९/झेड— ५३८० किंमती अंदाजे २००००००/— रु. मध्ये आरोपी क्र. २) मुज्सीम शहा शाब्बीर शहा, वय २४ वर्षे, रा. नांदगाव पेठ अमरावती यांचे सांगण्यावरुन त्याचे ताब्यातील वाहना मध्ये गौण खनिज ५२४४० ग्रॅम किंमती ८००००/— रु. असा एकूण २०,८०,०००/— रू.ची वाहनामध्ये भरुन चोरी करुन घेवुन जातांना मिळुन आल्याने त्यांचे ताब्यातून वरील नमुद मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— सहायक फौजदार समर्थ कोडापे पोस्टे नरखेड यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. नरखेड येथे आरोपींविरुध्द कलम ३७९, ३४ भादंवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार समर्थ कोडापे पोस्टे नरखेड हे करीत आहे.

## विनयभंग

**पो.स्टे. कळमेश्वर** :— दिनांक ०७/०९/२०२३ चे रात्री ०८/०० वा. दरम्यान फिर्यादी ही बाळांतीन बाईला तेल लावणे लहान मुलांची मालीश करण्याचे काम करत असुन यातील आरोपी नामे— बाल्या उर्फ जितेन्द्र रामाजी शेंडे, वय ३८ वर्ष, रा. खैरी हा फिर्यादी यांचे घरी आला व म्हणाला की जवळच्या गावातील बंगल्यावर जायचे आहे असे म्हणुन त्याचे गाडीवर बसवुन घेवुन गेला व अंधार दिसल्याने फिर्यादीने गाडी थांबविण्यास सांगितले असता बंगल्या समोर गाडी थांबविली व आरोपी याने शिवीगाळ करून फिर्यादीचे मनाला लाज वाटेल असे कृत्य करून फिर्यादीचा विनयभंग केला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कळमेश्वर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४ अ, ५०६ भादवी कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा १६७८ धनराज भुक्ते हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर